**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात आज धूलिवंदन आणि होळी पुरातन परंपरांचं जतन करत साजरी
- प्रधानमंत्री सूर्यघर योजनेच्या अंमलबजावणीत राज्य दुसऱ्या स्थानी
- महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी येत्या २ वर्षात शेअर बाजारात उतरणार

**आणि**

- विदर्भात अनेक ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा हवामान विभागाचा इशारा

**<><><><><>**

राज्यात आज धूलिवंदनाचा सण उत्साहाने साजरा होत आहे. होळी पौर्णिमेनिमित्त काल जागोजाग होळ्या पेटवण्यात आल्या. अनेक ठिकाणी स्थानिक देवतांच्या पालख्या यावेळी मिरवणुकीने नेल्या जातात. कोकणात दशावतारी खेळे आणि नमनाने हा सण साजरा होतो.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. होळीचा सण भारताच्या अमूल्य सांस्कृतिक वारशाचं प्रतीक असून तो एकता, प्रेम आणि सौहार्दाचा संदेश देतो, असं राष्ट्रपतींनी समाज माध्यमावरच्या आपल्या संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही समाजमाध्यमावरच्या संदेशातून सर्वांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. होळी हा सण म्हणजे चांगल्याचा वाईटावर विजय आणि वसंत ऋतुच्या आगमनाचं प्रतीक आहे, असं धनखड आपल्या संदेशात म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही देशवासियांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. आनंदाने भरलेला हा सण प्रत्येकाच्या आयुष्यात नवीन उत्साह आणि उर्जा आणेल, असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज धुलीवंदन साजरं केलं. विकसित महाराष्ट्राच्या वाटचालीत पर्यावरणीय समृद्धीची प्रतिज्ञा करुया, असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातल्या निवासस्थानी कुटुंबीय आणि कार्यकर्त्यांसोबत धुळवड साजरी केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही होळी आणि धूलिवंदनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. नागरिकांनी धुळवड खेळताना पाण्याचा अपव्यय टाळावा तसंच आरोग्याची काळजी घ्यावी असं आवाहन त्यांनी केलं आहे.

**<><><><><>**

राज्यात सर्वत्र विविध प्रकारे होळी साजरी होत आहे.  यवतमाळच्या मारेगाव तालुक्यातल्या बोरी इथे संत गदाजी महाराजांच्या यात्रेचं आयोजन करण्यात आलं आहे. या यात्रेत गोटमार होळीचा उत्सव साजरा होतो. धुलिवंदनाच्या दिवशी सकाळी गोटमार होळीला सुरुवात होते. गावातीलच एक व्यक्ती गदाजी महाराजांच्या मंदिरासमोर असलेल्या उंच जागेवर बसून गावकऱ्यांवर दगड मारते, तर गावकरी त्याच्यावर दगड मारत असतात. एखादा गावकरी दगड लागून मूर्च्छित पडल्यास ही गोटमार थांबते. गेल्या अनेक वर्षांची ही परंपरा आजही सुरू आहे. याबाबत ग्रामस्थ रवी गिरसावळे यांनी अधिक माहिती दिली.

**होल्ड बाईट - रवी गिरसावळे...( २१ सेकंद)**

**<><><><><>**

**जालना** शहरातील पारंपरिक धुलिवंदन हत्ती रिसाला मिरवणूक आज उत्साहात पार पडली. या मिरवणुकीचं हे १३६ वं वर्ष आहे. हत्तीवर बसलेल्या राजा-प्रधानाची मिरवणूक ज्या भागातून गुलालाची उधळण करत जाते, त्या

भागातील नागरिक रंग खेळणं थांबवतात, असा प्रघात आहे. आजही ही मिरवणूक उत्साहात पार पडली.

**बीड** जिल्ह्याच्या केज तालुक्यात विडा इथं धुळवडीच्या निमित्तानं शेकडो वर्षांपासूनची जावयाची गाढवावरुन मिरवणूक काढण्याची प्रथा यावर्षी रद्द करण्यात आली. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या पार्श्वभूमीवर विड्याच्या ग्रामस्थांनी सर्वानुमते हा निर्णय घेतल्याचं वृत्त आहे.

**नंदुरबारची** काठी होळी वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीनं साजरी केली जाते. सविस्तर माहिती ऐकूया आमच्या वार्ताहराकडून...

**व्हॉईस कास्ट - निलेश पवार**

**<><><><><>**

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत आतापर्यंत १ लाख ९२ हजार ९३६ सौर उर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्रानं देशभरात दुसरं स्थान मिळवल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. गेल्या वर्षी १३ फेब्रुवारी पासून सुरु झालेल्या या योजनेत देशभरात १० मार्च २०२५ पर्यंत एकूण १० लाख ९ हजार सौर उर्जा प्रकल्प बसवण्यात आले. या योजनेत महाराष्ट्र आपलं योगदान देत राहील तसंच २०२६-२७ पर्यंत १ कोटी कुटुंबांपर्यंत ही योजना पोहोचवण्याचं उद्दिष्ट असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

येत्या २ वर्षात शेअर बाजारात नोंदणी करण्याचं महावितरण अर्थात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचं नियोजन आहे, अशी माहिती कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा यांनी दिली. वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच विधानसभेत याचे सूतोवाच केलं होते. येत्या ५ वर्षात नवीकरणीय ऊर्जा स्रोतांपासून मिळणाऱ्या

वीजेचे एकूण वीज वितरणातलं प्रमाण १३ टक्क्यांवरुन ५२ टक्क्यांपर्यंत नेण्याचं नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><>

चित्रीकरण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व परवानग्या एकाच ठिकाणी मिळण्यासाठी शासनाने एक खिडकी योजना सुरू केली आहे. यासाठी सनियंत्रण संस्था म्हणून महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांसकृतिक विकास मंडळाची नियुक्ती करण्यात आली आहे.

<><><><>

जळगाव जिल्ह्यातल्या बोदवड रेल्वे स्थानकाजवळील फाटकावर ट्रक रुळावर बंद पडल्याने अमरावती एक्स्प्रेसची ट्रकला धडक बसली. रेल्वेरुळ पार करत असताना अचानक मालवाहू ट्रॅक बंद पडल्याने हा अपघात झाला. या अपघातात जीवीत हानी झाली नाही मात्र ट्रकमधल्या धान्याचं आणि ट्रकच मोठं नुकसान झालं आहे.

या अपघातामुळे २ गाड्या रद्द झाल्या असून ५ गाड्यांचे मार्ग बदलल्याचं रेल्वेनं कळवलं आहे.

<><><><>

पुरातन विभागामार्फत सुरू असलेले श्री विठ्ठल-मंदिराचे जनत, संवर्धन आणि जीर्णोद्धाराचे काम आषाढी यात्रेपूर्वी म्हणजेच ५ जूनपूर्वी पूर्ण करावीत अशा सूचना पुरातत्व विभागाला करण्यात आल्या आहेत. पंढपूर इथं मंदिर समितीची बैठक घेण्यात आली त्यात हे आदेश देण्यात आले. टोकन दर्शन प्रणालीची चाचणी घेण्याबाबतही या वेळी चर्चा करण्यात आली.

<><><><>

जगतगुरु श्री संत तुकाराम महाराज यांचं सदेह वैकुंठ गमन अर्थात बीज सोहळा श्री क्षेत्र देहू मध्ये येत्या रविवारी  होत आहे. या सोहळ्यासाठी राज्यभरातून

येणाऱ्या लाखो भाविकांना सोयी-सुविधा देण्यासाठी देहू नगरपंचायतीकडून जय्यत तयारी केली जात आहे. यंदा त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी बीज सोहळा आहे. त्यामुळे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांसाठी नगरपंचायत प्रशासनाकडून खबरदारी घेण्यात येत असल्याची माहिती देहू नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी निवेदिता घार्गे यांनी दिली.

पीएमपीएमएलतर्फे तुकाराम बीज निमित्त देहूगाव ला जाण्यासाठी १५ ते १७ मार्च दरम्यान जादा बस गाड्यांची व्यवस्था करत आहे. स्वारगेट, पुणे महानगरपालिका भवन, निगडी, पुणे स्टेशन आणि हडपसर इथून या गाड्या सुटणार आहेत.

**<><><><><>**

सोलापूर शहरातल्या छत्रपती संभाजी महाराज तलाव, किल्ला बाग आणि सिद्धेश्वर मंदीर परिसरात मरण पावलेल्या पक्ष्यांचा मृत्यू हा बर्ड फ्ल्यूमुळे झाला असल्याचा अहवाल भोपाळ इथल्या प्रयोगशाळेनं दिला आहे. प्रभावित क्षेत्राच्या दहा किलोमीटर परिसरातल्या पक्ष्यांचं सर्वेक्षण करून त्यांचे नमुने तपासणीसाठी पाठवण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथं ताब्यात घेण्यात आलेला सतीश भोसले उर्फ खोक्या याला शिरुरमधल्या न्यायालयानं ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

**//<><><><><>//**